# वृद्धत्व : दुसरे बालपण

कवीः डॉ. बिंदुमाधव जोशी

जुलै २००९

साठी उलटली, तोंड वासले - कांहो दात कुठे गेले; अहो हे दुसरे बालपण.
दंताजीचे ठाणे उठले, माळरान मुख म्लान; अहो हे दुसरे बालपण
गालांचे थोबाड झाले, गेली गुलाबी शान; अहो हे दुसरे बालपण
तोंड उघडता गुहा भासते, गेले संत्री महान; अहो हे दुसरे बालपण
टोपी काढली शीर चमकले - काहो केस कुठे गेले; अहो हे दुसरे बालपण
भांग हरवला, कोंबडा रूसला, कुरळे केस गतप्राण; अहो हे दुसरे बालपण
पाठ वाकली धनुष्य झाले, गेला कुठे तो त्राण; अहो हे दुसरे बालपण
नातू म्हणतो आजोबा परि ऐकु न शकती कान; अहो हे दुसरे बालपण
लटपट लटपट पाय थरकती, नाही गतीचे भान; अहो हे दुसरे बालपण
उठता बसता कट कट करती गुडघ्यांचे हे श्वान; अहो हे दुसरे बालपण
दात उडाले, केस गळाले पाठ कण्हे ती, गुडघे रडती
बालत्वाचे अन्य रूप हे वृध्दत्व करूण महान; अहो हे दुसरे बालपण.